# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 23/02/2023 (गुरूवार) सकाळ


### घरफोडी

**पो.स्टे. सावनेर** :– अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावरील जयस्तंभ चौक, गोलबाजार चौक सावनेर येथे दिनांक २१/०२/२०२३ चे २०.०० वा. ते दिनांक २२/०२/२०२३ चे ०३.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– शुभम गंगाधर माडेकर, वय २८ वर्ष, वार्ड क्र. ८ तेलीपुरा सावनेर यांच्या दुकानातील दिनांक २२/०२/२०२३ रोजी काउंटर मधील टेबलचे ड्रॉवर मध्ये ठेवलेले १० रू. चे अंदाजे १०० नोटा एकुण किंमती अंदाजे १०००/–रू. व ५०/– रू चे अंदाजे ३० नोटा एकुण किंमती अंदाजे १५००/–रू. व ५००/– रू. ची एक नोट एकुण किंमती ५००/–रू. असे एकुण अंदाजे ३०००/–रू. चोरीला गेल्याचे दिसले. तसेच माडेकर स्टोरमधुन किंमती अंदाजे ५०००/–रू. असा एकुण ८०००/– रूपयाचा मुद्देमाल नगदी कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक दोनोडे मो. नं. ९१४६६२५५३२ हे करीत आहे.

### चोरी

**पो.स्टे. काटोल** :– अंतर्गत १४ कि. मी. अंतरावरील मेटपांजरा शिवार येथे दिनांक ०९/०२/२०२३ चे २३:३० ते २३:४५ वा. सुमारास फिर्यादी नामे– पंकज रामविजय विधळे, वय ४७ वर्ष, रा. श्रीकृष्ण पेठ चांदूरबाजार रोड मोर्शी जि. अमरावती यांची पत्नी श्वेता ही लग्न समारंभ आटोपुन घरी परत आली. तिला फिर्यादीने त्याच्या सोबत झालेल्या अपघाता विषयी सांगीतले नव्हते. पत्नी श्वेता हिने फिर्यादीला कारमध्ये असलेल्या दागीन्याबाबत विचारपुस केली असता फिर्यादीने तिला घटनेबाबत काहीही न सांगता टाळा टाळ केली. परंतु दि. २०/०२/२०२३ रोजी फिर्यादीने तिला घडलेल्या घटणेबाबत सांगीतले. फिर्यादीच्या पत्नीने फिर्यादीला धिर देवुन त्याचे कारमधील बॅग मधील सोन्याचे दागीने चोरी झाल्याबाबत तक्रार देण्यास सांगितले. फिर्यादीच्या अपघातग्रस्त कारमधुन आरोपी नामे– १) महेश बबनराव वानखेडे वय ३० वर्ष, २) गजानन मारोतराव लोनगाडगे वय ३५ वर्ष, ३) ज्ञानेश्वर शामराव कांबळे वय ५२ वर्ष, तिन्ही रा. मेटपांजरा काटोल यांनी सोन्याचे दागीन्यांची चोरी केलेली असुन त्याचे वर्णन खालील प्रमाणे आहे.

१) दोन सोन्याच्या पाटल्या ४.३ तोळे अंदाजे वजनाच्या किंमती अंदाजे ०२,१५,०००/– रुपये
२) चार सोन्याच्या बांगड्या ५.८ तोळे अंदाजे वजनाच्या किंमती अंदाजे ०२,९०,०००/– रुपये
३) सोन्याचा नेकलेस काणातल्या जोडासह वजन २.५ तोळे अंदाजे वजनाचे किंमती अंदाजे ०१,२५,०००/– रुपये
४) सोन्याचा राणी हार ३ तोळे अंदाजे वजनाचा किंमती अंदाजे ०१,५०,०००/– रुपये
५) दोन सोन्याचे लहान मुलाचे बिंदले १.४ तोळे अंदाजे वजनाचे किंमती अंदाजे ७०,०००/– रुपये
६) एक सोन्याचे लहान मंगळसुत्र १३ ग्रॅम अंदाजे वजनाचे किंमती अंदाजे ६५,०००/– रुपये
७) एक सोन्याची दोन डोरले व चार मनी असलेले मंगळसुत्र १३ ग्रम अंदाजे वजनाचे कि. ६५,००० रुपये
८) एक सोन्याची चौन ५ ग्रम अंदाचे वजनाची कि. २५,००० रुपये

वरिल वर्णनाचे सोन्याचे दागीने अंदाजे २०.१ तोळे वजनाचे किंमती १०,०५०००/—रुपयाचा मुद्देमाल आरोपीतांनी चोरुन नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीतांविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक निभोंरकर पोलीस स्टेशन काटोल मो. नं. ९५२७३४७४४३ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**